महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI
अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्
1969

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## ऑक्टोबर २०२४

# ई वार्ता




N

**LEGEND**

| | | |
|---|---|---|
| | Central Campus of MPKV | |
| | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| C | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२७५७/२०२४

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या अधिस्वीकृती मंडळाकडून ''उत्कृष्ट'' मानांकन



**दि. २४ ऑक्टोबर, २०२४.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्वीकृती मंडळाच्या नुकत्याच झालेल्या ३७ व्या बैठकीमध्ये सन २०२३ ते सन २०२८ या पाच वर्षांसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाला अधिस्वीकृती मिळाली असून विद्यापीठास 'ए' ग्रेड/उत्कृष्ट मानांकन दिले आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विद्यापीठास व त्या अंतर्गत येणाऱ्या विविध महाविद्यालयांना पाच वर्षासाठी अधिस्वीकृतीसह 'ए' ग्रेड/उत्कृष्ट मानांकन प्राप्त झाले आहे. याबरोबरच विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयातील बीएससी (कृषि), पदव्युत्तरच्या कृषि व संलग्न पदव्या, बी. टेक, एम. टेक व आचार्य या पदव्यांच्या विविध विषयांना व महाविद्यालयांना राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने अधिस्वीकृती दिली आहे. यामध्ये राहुरी येथील पदव्युत्तर महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, पुणे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर, कृषि महाविद्यालय, धुळे, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय व कृषि महाविद्यालय, नंदुरबार यांचा समावेश आहे. हे मानांकन देताना राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीने जून महिन्यात विद्यापीठ व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली, यावेळी त्यांनी संबंधीत महाविद्यालयांच्या शैक्षणिक सुखसुविधा तसेच प्रयोगशाळांची पाहणी करुन विद्यार्थ्यांशी चर्चा केली. याप्रसंगी संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी या समितीसमोर सादरीकरण केले होते. या समितीने महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांचे विविध मुद्द्यांच्या आधारे सर्वेक्षण करुन मुल्यांकन केले. यामध्ये विद्यापीठस्तरीय तसेच महाविद्यालयांचे प्रशासन, विविध विषय शिकविणाऱ्या प्राध्यापकांची संख्या, शैक्षणिक उपक्रम, शिक्षणासाठी असलेल्या विविध सुविधा यामध्ये प्रामुख्याने अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने केलेल्या उपाययोजना, विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपलब्ध केलेल्या सुविधा, विद्यार्थ्यांचे विविध परिक्षांमधील यश, त्यांना मिळालेली पारितोषिके, त्यांची विविध कंपन्यांमध्ये झालेली निवड व त्यांनी सुरू केलेले उद्योग यांचा समावेश आहे. या समितीने कृषि उद्योजक माजी विद्यार्थी तसेच प्रगतशील शेतकरी यांच्याशी प्रत्यक्ष सुसंवाद साधुन त्यांचा विद्यापीठाशी असलेला समन्वय जाणून घेतला. अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे, नियंत्रक श्री. सदाशीव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, नोडल अधिकारी डॉ. एम.आर. पाटील आणि अधिस्वीकृती मिळालेल्या कृषि व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता यांनी या मानांकनासाठी विशेष योगदान दिले. या विशेष व बहुमोल मानांकनासाठी विद्यापीठातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे कुशल नेतृत्व व मार्गदर्शनाबद्दल अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ फिक्की नवी दिल्लीच्या ''युनिर्व्हसिटी ऑफ दि ईयर-फिक्की हायर एज्युकेशन एक्सलन्स-२०२४'' पुरस्काराने सन्मानीत

**दि. १८ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मानाचा समजला जाणारा नवी दिल्लीस्थित भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघाचा (फिक्की) या वर्षाचा सर्वोत्कृष्ट विद्यापीठ-२०२४ या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. हा पुरस्कार भारत सरकारचे ब्रिटीश उच्चायुक्त श्रीमती लिंडी कॅमेरॉन यांच्या शुभहस्ते देण्यात आला व हा पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी स्वीकारला. नवी दिल्ली येथे १० वी उच्च शिक्षण शिखर परिषद-२०२४ संपन्न झाली. या परिषदेमध्ये भारत सरकारचे ब्रिटीश उच्चायुक्त श्रीमती लिंडी कॅमेरॉन, भारत सरकारच्या उच्च शिक्षण मंत्रालयाचे अपर सचिव श्री. एस.के. बार्नवाल, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, देशातून आलेले औद्योगीक क्षेत्रातील तज्ञ, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठाने गत तीन वर्षात शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणात केलेल्या भरीव कार्याबद्दल हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. विद्यापीठाला देशातील पहिले ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र मंजुर झाले असून या केंद्राद्वारे आत्तापर्यंत २५० ड्रोन पायलट तयार झाले आहेत. कास्ट प्रकल्पाद्वारे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी ९७ विद्यार्थी, ३१ शास्त्रज्ञ आणि १२ अधिकारी यांना अमेरीका, जपान, थायलँड, मलेशिया, व्हियतनाम या देशात पाठविण्यात आले. कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरु केले असून या केंद्रांमध्ये अत्यंत आधुनिक व जागतीक दर्जाची देशी गायींची गोशाळा उभी करुन




तेथे देशी गायींवर, त्यांच्या दुध, शेण, गोमुत्र तसेच मुल्यवर्धीत उत्पादने यावर संशोधन होत आहे. विद्यापीठाने गेल्या तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यापीठाने विविध पिकांचे १६ वाण, २३१ कृषि तंत्रज्ञान शिफारशी आणि १२ सुधारीत कृषि यंत्रे व अवजारे शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केले आहे. देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते विद्यापीठाने विकसीत केलेले दोन वाण राष्ट्राला समर्पीत करण्यात आले. विद्यापीठाने गेल्या तीन वर्षात संशोधनामध्ये भरीव कामगिरी केली असून हा पुरस्कार मिळविणारे महाराष्ट्रातील हे एकमेव विद्यापीठ आहे.

## सेंटर ऑफ एक्सलन्स – देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे मा. उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार यांचे शुभहस्ते भूमिपूजन संपन्न



**दि. ९ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित पवार यांचे शुभ हस्ते पुणे कृषि महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागात संपन्न झाले. यानिमित्ताने नवीन अवजारे शेड याचे भूमिपूजन व नूतनीकरण केलेला मुक्त संचार गोठा व नवीन पर्यावरण नियंत्रित गोठ्याचे उद्घाटन त्यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी राज्याच्या गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे उपाध्यक्ष श्री. तुषार पवार, कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व या प्रकल्पाचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित पवार मार्गदर्शन करतांना म्हणाले की भारत हा पशुपालकांचा देश आहे. पूर्वजांनी जतन केलेल्या व लुप्त होत असलेल्या देशी गाईंचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. भारतासारख्या खंडप्राय देशांमध्ये अनेक प्रकारच्या देशी गाई आहेत. देशी गाईचे तूप खूप आरोग्यदायी आहे. देशी गायीचे मानवी आरोग्यातील व जीवनातील महत्त्व लक्षात घेता नुकतेच राज्य शासनाने देशी गाईस राज्यमाता–गोमाता हा दर्जा बहाल केला आहे, ज्याचा देशी गाईंच्या संवर्धनासाठी मोठा फायदा होणार आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

५० पेक्षा अधिक गाई असणाऱ्या गोशाळांना प्रती गाय प्रति दिन रुपये ५० इतके अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने देशी गाईंच्या संशोधनामध्ये केलेले कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. या सर्व प्रयत्नातून देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने शाश्वत देशी गोपालनाचे मॉडेल विकसित केले आहे. या केंद्राच्या बळकटीकरणातून शहरी लोकांना देशी गाईंचे महत्त्व समजेल, अंशमुक्त दूध उत्पादन निर्माण करणे शक्य होईल. या प्रकल्पामुळे देशी गो संवर्धनासाठी परंपरेला आधुनिकतेची जोड देणे गरजेचे आहे. या केंद्राच्या बळकटीकरणासाठी ७१ कोटींच्या भरीव निधीची तरतूद केली असून या निधीच्या आधारे या केंद्रामध्ये अत्यंत आधुनिक व जागतिक दर्जाची देशी गाईंची गोशाळा उभी करून तिथे संशोधन व आधुनिक पशुधन व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसित करणे शक्य होईल. हा प्रकल्प म्हणजे परंपरेला दिलेली आधुनिकतेची जोड ठरेल असे ते म्हणाले. याप्रसंगी श्री. शेखर मुंदडा यांनी सांगितले की गोसेवा आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून महाराष्ट्रापाठोपाठ देशातील १० राज्यात गोसेवा आयोगांची स्थापना करण्यात आली आहे. देशी गाय संवर्धनासाठी जी–१० व्हिजन डॉक्युमेंट प्रस्तावित केले आहे. यामध्ये प्रामुख्याने गो संवर्धन, गो संशोधन, गो संरक्षण, गो सेवा, गोमय प्रक्रिया, गो मूल्यवर्धन, गोशाळा, गो शेती, गो टुरिझम, गो साक्षरता असे उपक्रम राबविले जाणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन मा. ना. श्री. अजित पवार यांनी केलेल्या रुपये ७१ कोटींच्या निधीच्या भरघोस तरतुदीबाबत आभार व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी राज्याचे कृषिमंत्री मा. ना. श्री. धनंजय मुंडे व राज्याच्या गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. शेखर मुंदडा यांचे देखील आभार व्यक्त केले. या संशोधन केंद्रामध्ये देशातील पहिल्या पर्यावरण नियंत्रित गोठ्याची उभारणी केली असल्याचे त्यांनी सांगितले. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो व एका ध्येयाने कार्य केले तर यश निश्चित मिळते, त्यासाठी सकारात्मक विचाराने कार्य करत रहावे असे आवाहन कुलगुरू महोदयांनी केले. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी सन २००७ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठास केंद्र शासनाने १०० कोटींची मदत केली होती व त्यानंतर केवळ एकाच विभागास ७१ कोटी रुपयांची भरीव मदत मिळण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे नमूद केले. डॉ. महानंद माने यांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे परिसरात व गो परिक्रमा केल्यानंतर माणसाच्या सकारात्मक ऊर्जेमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. धीरज कंखरे यांनी केले.

## छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचा दिमाखदार लोकार्पण सोहळा संपन्न





**दि. ४ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील, काष्टी, मालेगांव येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलाचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात दूरध्वनीद्वारे राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सार्वजनीक बांधकाम (सार्वजनीक उपक्रम) व रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री ना.श्री. दादाजी भुसे होते. याप्रसंगी व्यासपीठावर खा. श्रीमती शोभा बच्छाव, आ. नरेंद्र दराडे, माजी मंत्री श्री. बबनराव घोलप, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, विभागीय आयुक्त नाशिक डॉ. प्रवीण गेडाम, कृषि परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे, नाशिकचे जिल्हाधिकारी श्री. जलज शर्मा, कृषि परिषदेचे कार्यकारी परिषद सदस्य श्री विनायक काशीद, विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य श्री. संजीव भोर, मालेगावचे अपर पोलीस अधीक्षक श्री. अनिकेत भारती आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





याप्रसंगी मा. मुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे मार्गदर्शन करतांना म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुलामध्ये पाच कृषि संलग्न महाविद्यालयांचा व एका कृषि तंत्रनिकेतनचा समावेश असून राज्यातील नव्हे तर भारतातील एकमेव अशी ही संकल्पना आहे. या कृषि विज्ञान संकुलामध्ये परिसरातील शेतकऱ्यांना येथील प्राध्यापकांद्वारे त्यांच्या समस्येवर योग्य मार्गदर्शन मिळणार आहे. या संकुलामुळे येथील शेतकऱ्यांचा शाश्वत विकास होणार आहे. यामुळे हे छत्रपती शिवाजी महाराज कृषि विज्ञान संकुल शेतकर्यांसाठी कृषि पंढरी ठरेल. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. सार्वजनीक बांधकाम मंत्री ना.श्री. दादाजी भुसे म्हणाले की आपण सतत पाठपुरावा करून सरकारची मान्यता घेऊन शेती महामंडळाच्या ६५० एकर क्षेत्रावर या कृषि विज्ञान संकुलाची उभारणी सुरु केली. या संकुलाद्वारे भविष्यातील शेतीचा वेध घेऊन विद्यार्थ्यांना कृषिचे आधुनिक शिक्षण देण्यात येणार आहे. हे संकुल भविष्यात शेतकर्यांना मार्गदर्शन केंद्र म्हणून ओळखले जाईल. यावेळी इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वार तसेच कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी नवीन इमारत व इतर पायाभूत सुविधांची पाहणी केली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक करतांना कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील म्हणाले कि आजचा लोकार्पण सोहळा हा सुवर्णयोग असून ना. भुसेंच्या अथक प्रयत्नाने या संकुलाची उभारणी शक्य झाली आहे. याप्रसंगी ना.श्री. भुसे यांच्या शुभहस्ते हे संकुल उभारणीमध्ये योगदान असणारे माजी कृषि अधिकारी श्री. प्रकाश पवार, वास्तुविशारद श्री. संग्राम साळुंखे, इंजि. संजय पवार, श्री. पाटकर, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, इंजि. समीर पवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार नांदगुडे यांनी केले. यावेळी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि परिषदेचे शिक्षण संचालक डॉ. हरिहर कौसडीकर, सहयोगी अधिष्ठता डॉ. सात्तप्पा खरबडे, डॉ. बबन इल्हे, प्रा. विवेक कानवडे, डॉ. सोमनाथ सोनवणे, डॉ. संदीप पाटील, कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, अधिकारी, कृषि विज्ञान संकुलाचे विद्यार्थी, पंचक्रोशितील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावचा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न

**दि. १३ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर याचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये माजी मंत्री आ. प्रा. राम शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कृषि परिषदेचे महासंचालक श्री रावसाहेब भागडे, अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के, संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे, कृषिमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी श्री पंडित खेडकर, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सात्ताप्पा खरबडे, हाळगाव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे आणि प्रगतीशील शेतकरी तसेच तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री आ. प्रा. राम शिंदे मार्गदर्शन करतांना म्हणाले की प्रतिकूल परिस्थितीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाची सुरुवात झाली. हे कृषि महाविद्यालय भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कृषि शिक्षणाचे दीपस्तंभ आणि शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र ठरेल. सध्या या महाविद्यालयासाठी एक कोटी लिटरचे शेततळे असून पुढे दोन शेततळे तयार करणार आहोत. विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी एक्सप्रेस फीडर लवकरात लवकर मंजूर होत आहे. कायमस्वरूपी पाणीपुरवठा साठी रत्नापुर तलावातून





पाईपलाईनचा प्रस्ताव मंजूर होत आहे. त्यासाठी १५ कोटी आपण मंजूर करणार आहोत. तसेच भव्य सभागृहासाठी रु. २० कोटीची मंजुरी शेवटच्या टप्प्यात आहे. याप्रसंगी अध्यक्ष मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील म्हणाले कृषि महाविद्यालयातील शास्त्रज्ञ विद्यार्थ्यांबरोबरच शेतकऱ्यांनासुद्धा पीक पद्धतीवर मार्गदर्शन करतील. शिक्षणाबरोबरच परिसरातील शेतकऱ्यांना शेतीचे ज्ञान देणे, पीक उत्पादन संदर्भातील समस्या सोडविणे हे एक उद्दिष्ट आहे. या परिसरातील शेतकऱ्यांसाठी या कृषि महाविद्यालयात बियाणे विक्री केंद्र तसेच वेळोवेळी मार्गदर्शन मिळावे यासाठी कम्युनिटी रेडिओ सुरू करणार आहोत. यावेळी कुलगुरूंच्या हस्ते महाविद्यालयासाठी आपल्या जमिनीतून रस्ता देणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये शेतकरी सिताराम ढवळे, विश्वनाथ ढवळे, मारुती ढवळे, धनंजय ढवळे, सुभाष ढवळे, आबासाहेब ढवळे, बाबासाहेब ढवळे,संजय मोरे आणि दशरथ सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. दिलीप पवार म्हणाले की या महाविद्यालयातून आजपर्यंत २०० विद्यार्थ्यांनी पदवी संपादन केली असून हे विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहे. सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी यावेळी या कृषि महाविद्यालयाची सद्यस्थितीची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते कृषि महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी केले तर आभार संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील शेतकरी, विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे १८ वाण देश पातळीवर प्रसारीत



**दि. २३ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधीत केलेले विविध पिकांचे १८ वाणांना नवी दिल्ली येथील कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या भारत सरकारच्या गॅझेटमध्ये अधिसुचीत करण्यात आली आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनाला यश प्राप्त झाले आहे. राज्यातील कृषि विद्यापीठांपैकी या कृषि विद्यापीठाचे राष्ट्रीय पातळीवर सर्वात जास्त वाण प्रसारीत झाले आहेत. अधिसुचनेमध्ये प्रसारीत केलेली पिके व त्यांचे वाण पुढीलप्रमाणे भात- फुले कोलम, मका-फुले उमेद व फुले चॅम्पीयन, ज्वारी-फुले पुर्वा, करडई-फुले भुमी, तूर-फुले पल्लवी, मुग-फुले सुवर्ण, उडीद-फुले राजन, राजमा-फुले विराज, ऊस-फुले १५०१२, घेवडा-फुले श्रावणी, गहु-फुले अनुराग, कापुस-फुले शुभ्रा, टोमॅटो-फुले केसरी, चेरी टोमॅटो-फुले जयश्री, घोसाळे-फुले कोमल, वाल-फुले सुवर्ण व मेथी-फुले कस्तुरी. केंद्राने अधिसुचीत केलेल्या यादीमध्ये सदरच्या वाणांचा समावेश झाल्यामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये होत असलेल्या संशोधनाची दखल देश पातळीवर घेण्यात आली आहे. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे.

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## फिक्की हायर एज्युकेशन एक्सलन्स पुरस्कार हा महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या इतिहासातील मानाचा तुराः कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची प्रतिक्रिया



**दि. २९ ऑक्टोबर, २०२४.** देशाचा मानाचा समजला जाणारा नवी दिल्लीस्थित भारतीय वाणिज्य आणि उद्योग महासंघाचा (फिक्की) या वर्षाचा सर्वोत्कृष्ट विद्यापीठ–२०२४ ह्या पुरस्काराने राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सन्मानीत करण्यात आले. यावेळी पुरस्कारासंदर्भात प्रतिक्रिया देतांना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील म्हणाले की गेल्या तीन वर्षात विद्यापीठाने कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणामध्ये केलेल्या अभुतपूर्व कार्यामुळे विद्यापीठाला हा पुरस्कार मिळाला. या विद्यापीठाने सर्वात प्रथम कृषि डिजीटल तंत्रज्ञानावर भर दिला. कास्ट प्रकल्पांतर्गत या विद्यापीठाने डिजीटल शेतीला प्रोत्साहन दिले. यामध्ये ५४ कृषि विषयक मोबाईल ॲप, वेबबेस ॲप्लीकेशन्स् आणि स्वयंचलीत हवामान केंद्रे विकसीत केले. विद्यापीठाला देशातील पहिले ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र मंजुर झाले. या केंद्राद्वारे आत्तापर्यंत २५० ड्रोन पायलट तयार झाले आहेत. या कास्ट प्रकल्पाद्वारे संशोधनाच्या कक्षा रुंदविण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी ९७ विद्यार्थी, ३१ शास्त्रज्ञ आणि १२ अधिकारी यांना अमेरीका, जपान, थायलँड, मलेशिया, व्हियतनाम या देशात पाठविण्यात आले. कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. या केंद्रांमध्ये अत्यंत आधुनिक व जागतीक दर्जाची देशी गायींची गोशाळा उभी करुन तेथे देशी गायींवर, त्यांच्या दुध, शेण, गोमुत्र तसेच मुल्यवर्धीत उत्पादने यावर संशोधन होवून आधुनिक पशुधन व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसीत करणे शक्य होणार आहे. कुलगुरु डॉ. पाटील पुढे म्हणाले की ऊस उत्पादन तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या दारात प्रभावीपणे हस्तांतरीत करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी आणि कार्बन केडीट मिळविण्यासाठी विद्यापीठाने सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेशी सामंजस्य करार केला. हा प्रकल्प सातारा जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात ६००० शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात येत आहे. सौरउर्जेबाबत कुलगुरु म्हणाले की विद्यापीठाने महाजनकोबरोबर सौरउर्जा निर्मितीसाठी सामंजस्य करार केला आहे. सौरउर्जा साक्षर करण्यासाठी बीसा, जबलपूर येथे २८२ शास्त्रज्ञ, विद्यार्थी व शेतकरी यांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरातील चारशे एकर पडीक जमिनीवर १०० मेगावॅट क्षमतेचा सौर विद्युत प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे. संशोधन कार्याबाबत बोलतांना कुलगुरु म्हणाले की गेल्या तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये विद्यापीठाने विविध पिकांचे १६ वाण, २३१ कृषि तंत्रज्ञान शिफारशी आणि १२ सुधारीत कृषि यंत्रे व अवजारे शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केले आहे. देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते विद्यापीठाने विकसीत केलेले दोन वाण राष्ट्राला समर्पीत करण्यात आले. यावर्षी राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाच्या १८ वाणांना केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या भारत सरकारच्या गॅझेटमध्ये अधिसूचीत करण्यात आले आहे. कृषि विस्तारसंदर्भात कुलगुरु म्हणाले की प्रगतशील शेतकऱ्यांची व कृषि पदवीधर उद्योजकांची यशोगाथा सर्वांना कळावी यासाठी मफुकृवि आयडॉल ही संकल्पना सुरु केली. त्याचप्रमाणे तंत्रज्ञानाच्या प्रभावी प्रसारासाठी फुले कृषि वाहिनी ९०.८ एफ.एम. कम्युनिटी रेडिओ स्टेशन विद्यापीठात सुरु केले आहे. सध्याच्या प्रतिकुल परिस्थितीत विद्यापीठाला मिळालेला हा पुरस्कार विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रोत्साहन देणारा आहे.

## कृषि विद्यापीठात सौर ऊर्जेवरील सिंचनप्रणाली या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**दि. १५ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कृषि अभियांत्रिकी विभागातील सेंटर ऑफ एक्सलन्स–स्मार्ट व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान प्रकल्पाने सौर उर्जेवरील सिंचनप्रणाली या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून नवी दिल्ली येथील बीसा या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक प्रा. अरुण जोशी उपस्थित होते. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार उपस्थित होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे व पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठातील सेंटर ऑफ एक्सलन्स अद्ययावत व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान या प्रकल्पाचे काम फार महत्त्वाचे आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून आतापर्यंत २८२ प्रशिक्षणार्थींना जबलपूर येथील बिसा संस्थेत सौर उर्जेवर आधारित सिंचन प्रणालीचे प्रशिक्षण देण्याकरिता पाठविण्यात आले. यामध्ये



विद्यार्थी, शेतकरी व विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. सध्या विद्यापीठामध्ये ४०० एकर क्षेत्रावर १०० किलोवॅट सोलर प्रकल्पाचे काम सुरू आहे. प्रमुख पाहुणे प्रा. अरुण जोशी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकऱ्यांसमोर प्रामुख्याने शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वेळेवर न होणे ही आहे. यासाठी अखंड व पुरेशा दाबाने वीजपुरवठा होत नसल्याने उत्पादनात घट येते. यावर जबलपूर येथील बीसा केंद्राने जी.आय. झेड. च्या मदतीने सोलरवरील प्रशिक्षणे सुरू करून मार्ग शोधला आहे. सौर पंपाच्या वापराने पाण्याची समस्या सुटेल व खऱ्या अर्थाने शेतकरी सुखी होईल. याप्रसंगी डॉ. सुनील गोरंटीवार आपल्या भाषणात म्हणाले की राहुरी कृषि विद्यापीठाने फार पूर्वी शेतीच्या सिंचन पद्धतीसाठी सौरऊर्जा उपयोगी ठरू शकते या विषयावर लक्ष केंद्रित करून संशोधन सुरू केले. खंडित वीजपुरवठा व आहे ती वीज पुरेशा दाबाने नसणे यावर सौर ऊर्जेचा वापर हा पर्याय महत्त्वाचा ठरणार आहे. या एक दिवसीय कार्यशाळेसाठी नवी दिल्ली येथील जी.आय.झेडच्या ऊर्जा सल्लागार प्रा. प्रेरणा शर्मा, नाशिक येथील मेडाचे विभागीय जनरल मॅनेजर श्री. हेमंत कुलकर्णी, नवी दिल्ली येथील बीसाचे सहयोगी संशोधक डॉ. परेश शिरसाठ, जबलपूर येथील बीसाचे स्टेशन कोऑर्डिनेटर व प्रमुख डॉ. महेश मस्के, जबलपूर येथील बीसाचे मृदाशास्त्रज्ञ डॉ. विवेक सिंग, सौर उर्जेचे तज्ञ श्री. प्रभात कनोजे यांनी सौर ऊर्जेवरील सिंचन प्रणाली या विषयावरील विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मुकुंद शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. सुनील कदम यांनी मानले. या कार्यशाळेसाठी बीसा, जबलपूर येथे सौर ऊर्जेवरील प्रशिक्षण घेतलेले शेतकरी, विद्यार्थी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात रब्बी व उन्हाळी हंगामासाठीची विभागीय बैठक संपन्न





**दि. २२ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठात विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती बैठक रब्बी व उन्हाळी–२०२४ चे आयोजन हायब्रीड मोडमध्ये करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी संशोधन संचालक श्री. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक



डॉ. गोरक्ष ससाणे, विस्तार व प्रशिक्षण संचालक श्री. रफिक नाईकवडी, कोल्हापूरचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. उमेश पाटील, नाशिकचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. सुभाष काटकर, पुणे विभागीय कृषि सहसंचालक श्री. दत्तात्रय गवसाने, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खडबडे व सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की रब्बी हंगामामध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध पिकांमुळे पिकांची फेरपालट होऊन जमिनीची प्रत सुधारते. विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या बैठकीमध्ये यावर्षी ०६ वाण, ०५ अवजारे व ९२ पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशी दिल्या आहेत. तसेच विविध पिकांचे ११ वाण देशपातळीवर प्रसारित झालेले आहेत. ही बाब विद्यापीठासाठी भूषणावह आहे. ड्रोन प्रशिक्षण देणारे देशातील हे एकमेव विद्यापीठ आहे. पुणे येथे देशी गाईबाबत तीन महिन्यांचे प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहे. याप्रसंगी श्री. नाईकवडी म्हणाले की या वर्षी सरासरीच्या १०५ टक्के पाऊस झाला आहे. भरपूर पाणी आहे, बियाणे उपलब्ध आहे तरी या गोष्टीचा फायदा उठवू या. विद्यापीठाचे तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करु. यावेळी डॉ. शिर्के यांनी संशोधन अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. ससाणे यांनी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण उपक्रमांचे सादरीकरण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्रीसुगी रब्बी प्रकाशनाचे विमोचन करण्यात आले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, नाशिक व पुणे कृषि विभागांचे कृषि सहसंचालक श्री. उमेश पाटील, श्री. सुभाष काटकर, श्री. दत्तात्रय गवसाने यांनी त्यांच्या विभागांचा अहवाल सादर केला. बैठकीदरम्यान डॉ. साताप्पा खरबडे यांनी हुमणीच्या नियंत्रणाबाबत, डॉ. सचिन नलावडे यांनी ड्रोनद्वारे करावयाच्या फवारणीसाठी औषधांच्या प्रमाणाबाबत, डॉ. विजू अमोलिक यांनी ज्वारी, ऊस व मका पिकांविषयीचे प्रश्न, डॉ. बी.टी. पाटील यांनी कांदा, आंबा, द्राक्ष व केळी याविषयी, डॉ. अण्णासाहेब नवले यांनी द्राक्ष, हळद, आले व केळी या पिकांविषयी, डॉ. नितीन दानवले यांनी करडई पिकाच्या बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत, डॉ. उत्तम कदम यांनी ज्वारी पिकाच्या किडीबाबत, डॉ. मनोज माळी यांनी हळद व आले पिकांबाबत, डॉ. अनिल दुरगुडे यांनी नॅनो युरिया व नॅनो डीएपी तसेच खतांच्या वापराविषयी, डॉ. सुनील कराड यांनी मका पिकाविषयी, डॉ. उल्हास सुर्वे यांनी सोयाबीन, कांदा, पेरू, सिताफळ, आंबा, हळद व तूर या पिकावरील माहिती विषयी, डॉ. कैलास भोईटे यांनी क्षारपड जमिनीवर येणाऱ्या उस वाणांची माहिती या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. पवन कुलवाल यांनी उझबेकीस्थान येथील ताश्कंद येथे झालेल्या जागतिक कपाशी संशोधन कॉन्फरन्समध्ये झालेल्या सादरीकरणाबाबतची माहिती दिली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. विजय शेलार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. या बैठकीस विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता, कृषि सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ व कृषि विभागाचे अधिकारी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शास्त्रज्ञांची पंचवार्षिक संशोधन आढावा बैठक संपन्न

**दि. १ ऑक्टोबर, २०२४.** अखिल भारतीय समन्वीत जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पातील भारताच्या पश्चिम विभागातील प्रमुख शास्त्रज्ञांची पंचवार्षिक संशोधन आढावा बैठक महात्मा फुले कृषि विद्यापीठात आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी पंचवार्षिक बैठकीचे प्रमुख व नवी दिल्ली येथील कृषि शास्त्रज्ञ निवड मंडळाचे माजी सदस्य डॉ. व्ही.एन. शारदा, पंचवार्षिक बैठकीचे सदस्य व आंध्रप्रदेशातील सी.व्ही. रमण वैश्वीक विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. एस.एन. पांडा, वसंतराव नाईक





कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. यु.एम. खोडके, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, भुवनेश्वर येथील भारतीय जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस. मोहंती आंतरविद्या जलव्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे व कृषि विद्या विभाग प्रमुख तथा जलव्यवस्थापन प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की शेतीसाठी पाण्याची उपलब्धता हा विषय दिवसेंदिवस जटील बनत आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन आवश्यक असून भविष्यातील सिंचन पाणी व्यवस्थापन हे बदलत्या वातावरणाशी सुसंगत असावे. यावेळी डॉ. व्ही.एन. शारदा यांनी जलसिंचनाच्या पाण्याचा वापर करतांना पृष्ठभागावरील पावसाचे पाणी, प्रवाही कॅनॉलचे पाणी, शेततळ्यातील पाणी व भुगर्भातील पाणी यांचे एकात्मिक कार्यक्षम वापरासंबंधी मार्गदर्शन केले. डॉ. एस.एन. पांडा यांनी आपल्या मनोगतात पाण्याची गुणवत्ता व संवेदन तंत्र आधारीत पाणी व्यवस्थापन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. यु.एम. खोडके यांनी आपल्या मनोगतात पाणी व्यवस्थापनाच्या आधुनिक सिंचन प्रणालीच्या वापराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या बैठकीचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते राहुरी येथील जलसिंचन प्रकल्पातील शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पोपळे, डॉ. अनिल दुरगुडे आणि डॉ. प्रशांत बोडके लिखीत जलसिंचन प्रकल्पातील सर्व शिफारशींचे माहिती पुस्तीका व नवसारी गुजरात येथील जलसिंचन प्रकल्पातील शास्त्रज्ञ डॉ. एन.जी. सावंत, डॉ. एस.एल. पवार व डॉ. व्ही.आर. नाईक लिखीत ऊस आणि केळी या पिकांची उत्पादकता वाढविण्याविषयी जलव्यवस्थापन तंत्रज्ञान पुस्तीका यांचे विमोचन करण्यात आले. यावेळी माजी अधिष्ठाता डॉ. बापुसाहेब भाकरे, माजी प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके तसेच पश्चिम विभागातील प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. प्रशांत बोडके यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात पैदासकार दिवस कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ७ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पात पैदासकार दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठात विविध पिकांवर संशोधन केले जाते त्यामध्ये पीक पैदासकारांचे योगदान हे अतिशय महत्त्वाचे असते. त्या अनुषंगाने विविध पिकांवर काम करण्याऱ्या शास्त्रज्ञांमध्ये चर्चा घडून यावी, सर्वांनाच अनोळखी असलेले ज्यूट व त्या गटातील इतर पिके यांबद्दल माहिती मिळावी आणि सेवानिवृत्त शास्त्रज्ञ तसेच अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभावे या दृष्टीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यापीठाचे माजी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मीलेट रिसर्च, हैद्राबादचे माजी संचालक डॉ. जे.व्ही. पाटील, कृषि वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ विजू अमोलिक व वरिष्ठ कापूस पैदासकार डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

डॉ. गोरंटीवार यांनी हायपर स्प्रेक्ट्रल इमेजिंग इन प्लांट ब्रीडिंग या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. डॉ. पाटील यांनी पीक पैदास पद्धती व त्यांचा वापर कसा करावा, संशोधनाची दिशा काय/कशी असावी व शेतकरी वर्गाला फायदेशीर ठरेल असे संशोधन करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला ज्यूट, अंबाडी, भुईमूग व कापूस या पिकांच्या प्रक्षेत्र भेटीचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या सामूहिक चर्चासत्रात सहभागी शास्त्रज्ञांनी आपली मते मांडली, मनोगत व्यक्त केले तसेच मार्गदर्शन केले व कापूस तसेच इतर पिकांच्या संशोधनात्मक विशेष बाबी दर्शविण्यात आल्या. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी







संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. पवन कुलवाल तसेच कापूस सुधार प्रकल्पातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाच्या विविध संशोधन केंद्रातील पीक पैदासकार तसेच कृषि वनस्पतीशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ, त्याचबरोबर विद्यापीठातील निवृत्त पीक पैदासकार उपस्थित होते.

## पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्रावर मुलभूत बियाणे विक्री व बेणे वाटपाचा शुभारंभ



**दि. ९ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली पाडेगांव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रामध्ये मुलभूत ऊस बियाणे विक्रीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि.चे चेअरमन श्री. पुरूषोत्तम जगताप, को ८६०३२ या वाणाचे जनक व माजी ऊस पैदासकार डॉ. आर. वाय.

जाधव आणि ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे उपस्थित होते. शेतकऱ्यांना फुले २६५ या ऊस वाणाच्या मुलभूत बेणेमळ्यातील पहिली मोळी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते देवून बियाणे विक्री व वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी श्री. जगताप म्हणाले की सोमेश्वर कारखाना स्थापनेपासून तो पूर्णक्षमतेने चालविण्यासाठी ऊसाची कमतरता भासत असल्यामुळे शेजारील जिल्हयातून गेटकेन ऊस आणावा लागत होता. परंतु पाडेगाव संशोधन केंद्राने सन २००७ मध्ये प्रसारित केलेल्या फुले २६५ वाणामुळे सन २००९–१० मध्ये कारखाना कार्यक्षेत्र व निरा नदी काठावरील चोपन जमिनीमध्ये फुले २६५ या वाणाची अधिक उत्पादन व साखर देणार्या वाणाची लागवड झाल्यामुळे कारखाना ऊस पुरवठयाबाबत स्वयंपूर्ण झाला.

यावेळी डॉ. राजेंद्र भिलारे मार्गदर्शन करतांना म्हणाले की पाडेगाव संशोधन केंद्रावर सध्या ५५ एकर क्षेत्रावर विविध ऊस वाणांचे मुलभूत बियाणे मळे उभे आहेत. उसाच्या मुलभूत बियाण्यापासून कारखान्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत बेणे मळे तयार करून शेतकऱ्यांना बेणे पुरवठा करण्यात येतो. सध्या या संशोधन केंद्राने फुले ऊस १५०१२, १३००७ आणि १५००६ या वाणांचे मोठया प्रमाणावर मुलभूत बियाणे मळे केंद्रामार्फत तयार केलेले आहेत. त्याचबरोबर को ८६०३२, फुले २६५, फुले १०००१, फुले ९०५७, फुले ११०८२ या वाणांचे बियाणे उपलब्ध होणार आहेत. चालू वर्षी साधारणपणे १.०० कोटी दोन डोळा टिपरी बियाणे विक्रीस उपलब्ध होणार आहे. याप्रसंगी को ८६०३२ या वाणाचे जनक व माजी ऊस पैदासकार डॉ. आर. वाय. जाधव यांचा ऊस पिकातील महत्वपूर्ण योगदानाबद्दल संशोधन केंद्रामार्फत विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमावेळी ऊस संशोधन केंद्रातील ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे, ऊस मृदाशास्त्रज्ञ डॉ. कैलास काळे, ऊस शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी श्री. बापूराव गायकवाड आणि ऊस विकास अधिकारी श्री. विराज निंबाळकर, वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. रणजितसिंह निंबाळकर, डॉ. दत्तात्रय थोरवे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. किरणकुमार ओंबासे, डॉ. माधवी शेळके, श्री. राजेंद्र पांढरे, श्री. संतोष शिंदे, श्री. दिनेश पाटील व श्री. भाऊसाहेब बेल्हेकर हे उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन डॉ. दत्तात्रय थोरवे यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांच्या उपोषणाला आले यश



**दि. १० ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे दि. ३ ऑक्टोबर, २०२४ पासून सुरु असलेले प्रकल्पग्रस्तांचे उपोषण कलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते प्रकल्पग्रस्त कृति समितीचे सचिव श्री. सम्राट लांडगे, श्री. नारायण माने, श्री. प्रविण थोरात यांना नारळपाणी देवून सोडण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे, राहुरीचे नायब तहसीलदार श्री. सोपान बाचकर, तलाठी श्री. विकास शिंदे उपस्थित होते. प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यासाठी कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी वेळोवेळी सरकारदरबारी सकारात्मक पाठपुरावा केला. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे यांनी उपोषणस्थळी भेट देवून तेथून मोबाईलद्वारे मंत्रालयात प्रकल्पग्रस्तांच्या भरतीसंदर्भातील मागणीचा पाठपुरावा केला. त्यानंतर पूर्वनियोजीत असलेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य झाल्या. त्याबद्दल प्रकल्पग्रस्तांनी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे आभार मानले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ज्या ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या त्या शेतकरी कुटुंबातील सदस्याला विद्यापीठामध्ये नोकरी देणे अशी तरतुद आहे. सरकारने या संघर्षाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघून प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य केल्या व तसा कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्यात आला. याबद्दल

प्रकल्पग्रस्तांनी महसूल मंत्री व अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री मा.ना.श्री. धनंजय मुंडे आणि कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे आभार व्यक्त केले.

## राहुरी कृषि विद्यापीठात वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन



**दि. १५ ऑक्टोबर, २०२४.** मराठी भाषा विभाग भाषा संचालनालय व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाकडून माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दि. १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन प्रसिद्ध लेखक व अहिल्यानगर येथील सारडा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषिशास्त्र परिभाषा कोश (सुधारित) उपसमितीचे अध्यक्ष डॉ. भीमराव उल्मिक होते. याप्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य श्री. जयंत येलुलकर, भाषा संचालनालयाचे सहाय्यक भाषा संचालक श्री. शरद यादव, पर्यवेक्षक श्री. संदीप साबळे व अनुवादक श्री. मुकुंद गोरे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करतांना डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे म्हणाले की आपल्या भारताला कृषि व ऋषीची परंपरा लाभली आहे. पूर्वी गुरुकुल पद्धतीमध्ये ऋषी विद्यार्थ्यांना सर्व शाखा शिकवत असे. परंतु, आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये हे पहावयास मिळत नाही. आपल्या कृषि संस्थेमध्ये शेतकऱ्याला खरे द्रष्टेपण असते. डॉ. दिलीप पवार आपल्या भाषणात म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे प्रत्येक वर्षी मराठी वाङ्मयाची पुस्तके खरेदी करण्यावर भर देत असते. किमान ५००० रुपयांच्या पुस्तकाची खरेदी करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. याप्रसंगी डॉ. भीमराव उल्मेक यांनी मराठी भाषेविषयी आपण सर्वांनी आस्था बाळगली पाहिजे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील फुलसावंगे यांनी केले. यावेळी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात मृदेची धुप, पोषकता व मृदा संवर्धन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

**दि. १७ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील काटेकोर शेतीसाठी डिजीटल तंत्रज्ञानावर आधारीत सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत मृदेची धुप, पोषकता व मृदा संवर्धन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी प्रमुख्य व्याख्याते म्हणुन भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतील मृदा व जलसंवर्धन विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राजीवकुमार सिंग उपस्थित होते. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा कुलसचिव तथा सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे व पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की जमिनीतील मातीची धूप कमी करणे, पाणी व्यवस्थापन करणे या सारखे उपाय योजून जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी लक्ष दिले तरच भविष्यात जमीन शाश्वत उत्पन्न देईल. याप्रसंगी डॉ. सिंग यांनी सद्यस्थितीतील भारताच्या जमीन वापराच्या पध्दतीतील बदल, जमिनीचा ऱ्हास आणि पोषकता, पाणलोट स्थितीतील बदल, पाणलोट विकासाचे मुल्यांकन आणि व्यवस्थापन या विषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत,



प्रास्ताविक डॉ. मुकुंद शिंदे यांनी तर आभार मृद व जलसंधारणाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. व्ही.एन. बारई यांनी मानले. हे व्याख्यान आयोजन करण्यामध्ये प्रकल्पाच्या संशोधन सहाय्यक डॉ. शुभांगी घाडगे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी शास्त्रज्ञ, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरी कृषि विद्यापीठात आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे आयोजन





**दि. २७ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यापीठातील क्रीडा भवनात या आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या मैदानी स्पर्धेचे उद्घाटन अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, राष्ट्रीय योजनेचे संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.महावीरसिंग चौहान, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, माजी विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. शरद पाटील, माजी क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. बाबासाहेब भिंगारदे, एनसीसीचे अधिकारी डॉ. सुनील फुलसावंगे व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव तथा शारीरिक शिक्षण निदेशक श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते. यावेळी डॉ. पवार म्हणाले की स्पर्धा खेळण्यासाठी मैदानावर उतरल्यानंतर स्पर्धेबरोबरच नवीन मित्र जोडा. तुमची खेळातील उच्च क्षमता गाठण्यासाठी प्रयत्न करा. परंतु, यामध्ये अपयश आले तर मनामध्ये खंत बाळगू नका. या मैदानी स्पर्धेमध्ये लांब उडी, उंच उडी, ट्रिपल जंप, गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, धावणे व रीले इत्यादी क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा पार पडल्या. सकाळच्या सत्रात झालेल्या ५००० मीटर धावणे, ८०० मीटर धावणे व भालाफेक या स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यामध्ये ५००० मीटर धावणे या पुरुषांच्या स्पर्धेत सुवर्णपदक बारामती महाविद्यालयाचा विद्यार्थी ओम पिंपळे याला तर

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

रौप्यपदक पुणे कृषि महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिश राऊत याला तर कांस्यपदक दोंडाईचा कॉलेजचा विद्यार्थी सिताराम पाडवी याने पटकावले. ८०० मीटर मुलींच्या धावण्याच्या स्पर्धेमध्ये बारामतीच्या प्रतिक्षा माळशिकारे हिने सुवर्णपदक, येवला कृषि महाविद्यालयाच्या हर्षाली महाले हिला रौप्यपदक तर जयनापुर कृषि महाविद्यालयाच्या प्रगती करनाळे या विद्यार्थिनीने कांस्यपदक पटकावले. भालाफेक स्पर्धेमध्ये बारामती कृषि महाविद्यालयाची वैष्णवी नरुटे हिने सुवर्णपदक तर धुळे कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी वृंदा गंजुरे हिला रौप्यपदक तर पुणे कृषि महाविद्यालयाची तनुजा फाटे या विद्यार्थीनीने कांस्यपदक मिळविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन नलावडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विक्रम कड यांनी तर आभार श्री. वैभव बारटक्के यांनी मानले. या मैदानी स्पर्धेसाठी २७ कृषि महाविद्यालयातील ३७ संघ व्यवस्थापकांसह २० पंच, २९१ मुले व २०० मुली असे एकूण ४९१ विद्यार्थी सहभागी झाले.

## पुणे कृषि महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात वसुबारसेचा सण उत्साहात



**दि. २८ ऑक्टोबर, २०२४.** पुणे कृषि महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये वसुबारसेचा सण पारंपारिक पद्धतीने अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी उपस्थितांसह सवत्स धेनूचे पूजन केले. याप्रसंगी गुजरात येथील आणंद कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम.सी. वार्ष्णेय, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. शंकरराव मगर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्यंकटराव मायंदे, माजी कुलगुरू डॉ. विलास भाले, माजी कुलगुरू डॉ. संजय सावंत, पुणे येथील फुलोत्पादन संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. के.व्ही. प्रसाद, पुणेचे सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, कृषि महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद पाटील, माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की देशी गोपालनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत व फायदेशीर उत्पादनाचा स्त्रोत निर्माण होणार आहे. सध्याच्या बदलत्या हवामानाच्या परिस्थितीमध्ये देशी गाईंना अनन्यसाधारण महत्व आहे. यावेळी सर्व उपस्थितांनी गायींचे गोठे, गोपरिक्रमा, स्वयंचलित वातावरण नियंत्रित गोठा, फुले स्मार्ट हवामान केंद्र, सौर ऊर्जा प्रकल्प, गोबर गॅस संयंत्र व दुग्ध प्रक्रिया प्रयोगशाळा या ठिकाणी भेट दिली व शाश्वत देशी गोपालनाच्या मॉडेलची पाहणी केली. या प्रसंगी केंद्राचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ८ अधिकारी व कर्मचारी झाले सेवानिवृत्त

**दि. ३० ऑक्टोबर, २०२४.** विद्यापीठाने आजपर्यंत केलेल्या यशस्वी वाटचालीमध्ये विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान आहे. कर्मचारी हेच कृषि विद्यापीठाचे आधारस्तंभ आहेत. आपण किती जगलो त्यापेक्षा आपण कसे जगलो याला महत्व असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे ऑक्टोबर महिन्यात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार व सेवानिवृत्त विषयक लाभ देण्यासाठी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देतांना डॉ. दिलीप पवार म्हणाले की माझ्या कार्यकाळामध्ये माझ्याकडून जे संशोधनात्मक काम झाले आहे





त्यामध्ये माझ्या सहकाऱ्यांचे पूर्ण श्रेय आहे. विद्यापीठात केलेल्या कामाचे मला पूर्ण समाधान आहे. डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की जमिनीतील माती ज्याप्रमाणे पौष्टिक असते, विविध गुणधर्मांनी युक्त असते त्यावेळेस तिच्यातून उगवणाऱ्या पिकाचे उत्पादन चांगले येते, त्याप्रमाणे विद्यापीठाची संस्कृती चांगली असल्यामुळे या विद्यापीठाने केलेल्या संशोधन, शिक्षण व विस्तार कार्यामध्ये उच्च स्थान प्राप्त केले आहे. डॉ. गोरक्ष ससाणे यांनी यावेळी बोलताना डॉ. दिलीप पवार, डॉ. दिपक दुधाडे यांच्या विद्यापीठातील कारकिर्दीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राहुरी, धुळे, कोल्हापूर व पुणे या चार विभागातील ८ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सेवानिवृत्त होणारे डॉ. दिलीप पवार, डॉ. दिपक दुधाडे व श्री. अरविंद क्षीरसागर यांचा सत्कार करण्यात आला. कुलगुरु डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे यांच्या कार्यतत्परतेमुळे सेवानिवृत्त होणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीविषयक लाभ अदा करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. संजय रुपनर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, सहाय्यक कुलसचिव (प्रशासन) श्री. सागर पेंडभाजे, श्री. बाळासाहेब पाटील, श्रीमती शैला पटेकर व श्रीमती शिल्पा चतारे यांनी अथक परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात खरीप आढावा व रब्बी नियोजन बैठक २०२४ संपन्न





**दि. ३० ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे खरीप आढावा व रब्बी नियोजन बैठक कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हायब्रीड मोडमध्ये संपन्न झाली. या बैठकीमध्ये विद्यापीठातील सर्व संशोधन केंद्रातील खरीप बीजोत्पादन पिकांचा आढावा घेण्यात येऊन रब्बी हंगामातील कांदा, गहू, हरभरा व करडई या बीजोत्पादन पिकांचे मूलभूत, प्रमाणित, सत्यप्रत वाणांचे उत्पादन कोणत्या ठिकाणी व किती क्षेत्रावर घ्यावयाचे याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पाटील आपल्या मार्गदर्शनामध्ये म्हणाले की विद्यापीठाने कृषि

मंत्रालय, भारत सरकार, महाबीज, बियाणे महामंडळ, यांच्याकडील रब्बी हंगामातील बियाणे मागणी लक्षात घेऊन जास्तीचे बियाणे उत्पादन तयार करून ते शेतकरी/खाजगी बीजोत्पादक कंपनी यांना विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून द्यावे तसेच महाराष्ट्रातील वाढते डाळिंब पिकाचे लागवडीसाठी शेतकऱ्यांना चांगल्या गुणवत्तेचे, दर्जाचे, कलमे रोपे विद्यापीठाने तयार करण्यासाठी टिशूकल्चर आधारित रोपांची निर्मिती करण्याकडे प्राधान्याने तयारी करण्याबाबत सूचना त्यांनी केली. याप्रसंगी अहिल्यानगर महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक श्री. दौंड व राष्ट्रीय बीज निगमचे श्री. सौरदीप बोस यांनी बीजोत्पादन विषयक चर्चेत सहभाग नोंदवला. या बियाणे आढावा बैठकीचे सादरीकरण प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांनी केले. यावेळी उपसंशोधन संचालक, विविध विभागांचे विभाग प्रमुख, बीजोत्पादन अधिकारी डॉ. के.सी. गागरे, प्रा. बी.टी. शेटे, बियाणे विभागाचे सर्व प्रभारी अधिकारी, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बियाणे पैदासकार अधिकारी, शास्त्रज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी केले.

## कसबे डिग्रज कृषि तंत्र विद्यालयाला कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांची भेट व मार्गदर्शन






**दि. ८ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सांगली जिल्ह्यातील असलेल्या कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता. मिरज येथे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी भेट दिली. यावेळी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी व माजी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की कृषि शिक्षण हे मुळ शिक्षण असून शेतीसाठी पायाभूत शिक्षण आहे. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी व्हावे जेणेकरून अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर आपला आत्मविश्वास वाढेल आणि आपण रोजगार निर्माण करणारे व्हाल. यावेळी डॉ. शिर्के विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि आधारतीत उद्योग मोठे आहेत. त्यातून बळीराज्याला पुढे आणण्यात विद्यार्थ्यांनी कष्ट घ्यावेत. डॉ. मनोज माळी यांनी हळद, ऊस, भुईमुग, मका या पिकांचे मोठ्या क्षेत्रावर बिजोत्पादन राबविण्यात आला आहे असे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ प्रदीप पाटील, प्रदीप मुर्कीभावी, दिगंबर आकीवटे, प्रज्वल गागरे, महेश केवले, राजू कापसे, गजानन डाखोरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानमध्ये शिष्यवृत्तीसाठी सामंजस्य करार

**दि. २३ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण मिळावे यासाठी ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान व महात्मा फुले कृषि विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार पार पडला. या सामंजस्य करारावर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार आणि श्रमिक प्रतिष्ठानच्या मॅनेजींग ट्रस्ट्री श्रीमती योगीनी करपे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या करारांतर्गत ग्रामीण श्रमीक प्रतिष्ठानच्यावतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी व प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना दरवर्षी एकुण रु. २२ लाख शिक्षवृत्ती देण्यात येणार आहे. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. दिलीप पवार म्हणाले की या सामंजस्य करारामुळे कृषि विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रशिक्षणाद्वारे स्वतःचे करियर घडविण्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ मिळणार आहे. यावेळी कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नांदगुडे,



संस्थेचे ट्रस्टी श्री. प्रशांत सुडे, श्री. नितीन जाधव, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. विरेंद्र बारई, डॉ. ममता पटवर्धन व डॉ. सुनील फुलसावंगे उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा



**दि. ३० ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार दि. २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्याविषयी कळविण्यात आले आहे. या अनुषंगाने दक्षता सप्ताह विद्यापीठात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे व कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील मार्गदर्शन करताना म्हणाले की प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी आपले काम प्रामाणिकपणे तसेच कशाचीही अपेक्षा न ठेवता केले पाहिजे. प्रत्येकाने लाचखोरीविषयी जागृत राहिले पाहिजे असे यावेळी ते म्हणाले. यावेळी उपस्थितांना कुलसचिव डॉ. मुकुंद शिंदे यांनी भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ दिली. यावेळी ते म्हणाले की या दक्षता जनजागृती सप्ताहाचा या वर्षीचा आशय राष्ट्राच्या समृध्दीसाठी अखंडतेची संस्कृती असा आहे. यावेळी विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात निधी आपके निकट-२.० या कार्यक्रमाचे आयोजन

**दि. १ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अहमदनगर येथील प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त कार्यालयाच्या वतीने निधी आपके निकट-२.० या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. अरुण आनंदकर होते. यावेळी विद्यापीठाचे कामगार कल्याण अधिकारी डॉ. नितीन उगले, प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त कार्यालयातील प्रवर्तन




अधिकारी श्री. गोपाळ मधे, अनुभाग पर्यवेक्षक श्री. पंकज कुमार, सामाजिक सुरक्षा सहाय्यक श्री. सचिन लांडे व राज्य कर्मचारी विमा सहाय्यक श्री. विशाल गायकवाड उपस्थित होते. यावेळी श्री. आनंदकर मार्गदर्शन करतांना म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कंत्राटी मजुरांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत येणाऱ्या सर्व प्रकारच्या अडचणींवर मार्ग काढण्यात येईल. भविष्यात या कंत्राटी मजुरांच्या भविष्य निर्वाह निधी संदर्भात सर्व त्रुटी दूर करण्यात येतील. असे काम करणारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबत उत्कृष्ट काम करणारे एक रोल मॉडेल बनेल. यावेळी कंत्राटी मजुरांना व कंत्राटदार यांना येणाऱ्या विविध समस्या तसेच कंत्राटी मजुरांच्या अडीअडचणी, शंका यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. केवायसी करण्यासंदर्भात तसेच भविष्य निर्वाह निधीसंबंधी येणाऱ्या अडचणी कंत्राटी मजुरांना तसेच कंत्राटदारांना समजावून सांगण्यात आल्या तसेच त्यावर सखोल असे मार्गदर्शन अधिकाऱ्यांकडून करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कामगार कल्याण अधिकारी कार्यालयातील श्री. दादासाहेब कोहकडे, श्री. बाळासाहेब मंडलिक यांचे सहकार्य लाभले.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत शेतकरी अभ्यास दौऱ्याचे यशस्वी आयोजन





**दि. ११ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी.के. ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत निघोज, ता. पारनेर येथे रसाळ डाळिंब फार्म येथे एक दिवसीय शेतकरी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी युवा प्रगतशील शेतकरी श्री. राहुल रसाळ यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या प्रत्यक्ष शेतावर मार्गदर्शन केले. त्यांनी डाळिंब लागवड, तण नियंत्रण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. डाळिंब लागवड ही उत्तर दक्षिण दिशेस १४१० फुटावर केल्यास पिकास चांगला सुर्यप्रकाश उपलब्ध होतो. डाळिंब बागेच्या चोहोबाजूला गिन्नीसारख्या उंच वाढणाऱ्या पिकांची लागवड केल्यास त्याचा वारा विरोधक म्हणुन चांगला उपयोग होतो तसेच वाऱ्यापासून फळबागेचे संरक्षण होते. फवारणी करतांना हवामान आधारीत घटकांची स्थिती लक्षात घेऊन व्यवस्थित फवारणी सायंकाळी केल्यास त्याचा चांगला परिणाम किड व रोग नियंत्रणावर दिसून येतो. यावेळी त्यांनी बहार व्यवस्थापनात कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. डाळिंब व्यवस्थापन तंत्रज्ञानाचे व्यवस्थित अनुपालन केल्यास डाळिंब पिकावरील मर व तेल्यारोगाचे यशस्वी नियंत्रण करणे शक्य आहे. यानंतर त्यांच्या घरी द्राक्षबागेत बसविलेल्या स्वयंचलीत हवामन केंद्रास शेतकऱ्यांनी भेट दिली. श्री. रसाळ यांनी त्यांच्या शेतात

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

डिजीटल तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. फळबागांना फवारणी करतांना त्यांच्या शेतावर बसविलेल्या डिस्टील वॉटर युनिटचा वापर करतात. त्यामुळे पीक उत्पादन खर्चात निश्चितच बचत होते. यावेळी शेतकऱ्यांनी देशी गार्यींच्या गोठ्याला भेट देवून शेणापासून स्लरी तयार करण्याच्या युनिटची पाहणी केली. या स्लरीचा वापर ते त्यांच्या डाळिंब, पेरु, द्राक्ष, पपई या फळबागांसाठी करतात. यावेळी श्री. राहुल रसाळ यांनी शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन केले. प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांचे हस्ते शेतकरी अभ्यास दौऱ्याला प्रारंभ झाला. या दौऱ्यात प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ, डॉ. भगवान देशमुख, प्रक्षेत्र सहाय्यक श्री. किरण मगर, श्री. राहुल कोऱ्हाळे आदींनी सहभाग घेतला. शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत असलेल्या तांभेरे, कानडगांव, कणगर, चिंचविहिरे या गावातील ४४ डाळिंब उत्पादक शेतकरी या अभ्यास दौऱ्यात सहभागी झाले होते.

## सांगली जिल्ह्यातील पेडगावच्या शेतकऱ्यांची कृषि विद्यापीठास भेट






**दि. १४ ऑक्टोबर, २०२४.** कृषि विद्यापीठातील कास्ट प्रकल्पाचे शेतीच्या डिजीटलायझेशनचे आणि हवामान अद्ययावत व पाणी व्यवस्थापनाचे काम अतिशय वाखणन्यासारखे आहे. कृषि विद्यापीठातील संगमनेरी शेळी सुधार प्रकल्प, सेंद्रिय शेती प्रकल्प हा शेतकऱ्यांना दिशादर्शक आहे असे प्रतिपादन सांगली जिल्ह्यातील पेडगावचे सरपंच श्री. प्रदिप चव्हाण यांनी केले. सांगली येथील पेडगावच्या ग्रमस्थांनी नुकतीच महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विविध प्रकल्पांना भेट दिली व शेतीचे तंत्रज्ञान जाणुन घेतले. या ग्रामस्थांचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे आणि सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी स्वागत केले. यावेळी पेडगावच्या ग्रामस्थांनी कास्ट प्रकल्प, ड्रोन प्रकल्प, अद्ययावत हवामान केंद्र, संगमनेरी शेळी सुधार प्रकल्प, सेंद्रिय शेती प्रकल्पास भेट दिली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य श्री. मदन शेंडगे, श्री. मनोहर पाटील, श्री. निलेश शेंडगे, श्री. राजेंद्र शेंडगे, सोसायटी सदस्य श्री. दिलीप शेंडगे, श्री. विकास शेंडगे, श्री. अमोल शेंडगे व इतर ग्रामस्थांचा सहभाग होता. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन यांनी या भेटीचे नियोजन केले व प्रकल्पांसंदर्भात शेतकऱ्यांना माहिती दिली.

## काटेकोर शेती विकास केंद्रातर्फे हायड्रोपोनिक्स शेतीवरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**दि. २५ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काटेकोर शेती विकास केंद्र, एनसीपीएएच, कृषि मंत्रालय आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंबी, एमआयडीसी, तळेगाव येथील गोविंद ग्रीन हाऊस येथे हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक श्री. किसन मुळे, काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. सचिन डिंगरे, गोविंद ग्रीन हाऊस, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. बाळासाहेब गाडेकर, एमंसीडीसी, पुणेचे मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी श्री. हेमंत जगताप उपस्थित होते. यावेळी झालेल्या तांत्रिक मार्गदर्शनात श्री. मुळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना व्यावसायिक दृष्टिकोनातून हायड्रोपोनिक्स शेतकऱ्यांच्या जीवनात कसे समाविष्ट होऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ डिंगरे यांनी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान,







रासायनमुक्त भाजीपाला उत्पादन आणि तांत्रिक बाबींबद्दल मार्गदर्शन केले. श्री. जगताप यांनी हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचे विविध प्रकार याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. श्री. गाडेकर यांनी हायड्रोपोनिक्सच्या पद्धतींच्या प्रात्यक्षिकांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ३२ शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन



**दि. १५ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय सेवा योजना एककतर्फे वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या स्मृति जतन करण्याच्या उद्देशाने हा त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी तथा प्रभारी ग्रंथालय प्रा. नामदेव धूर्वे, सहाय्यक ग्रंथपाल प्रा. जयदीप बोरसे, डॉ. ए. के. कोळगे, डॉ. आर. डी. चौधरी, श्री. प्रशांत नागे, डॉ. आर. एस. शेख, प्रा. एन. जी. धूर्वे, डॉ. कुशल ढाके, डॉ. तुषार भोसले, डॉ. सागर बंड, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. मनीषा पालवे, श्री. जयदीप बोरसे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. संदीप पाटील मार्गदर्शनात म्हणाले की विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले. प्रा. जयदीप बोरसे यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात असलेल्या पुस्तकांची माहिती दिली. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक ग्रंथपाल प्रा. जयदीप बोरसे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धूर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे कायदेविषयक माहिती शिबीर संपन्न

**दि. १८ ऑक्टोबर, २०२४.** कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील कृषि पदवी अभ्यासक्रमात या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ कार्यक्रमाअंतर्गत तालुका विधी सेवा समिती व अधिवक्ता संघ, मुक्ताईनगर यांचे संयुक्त विद्यमाने कायदेविषयक माहिती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता




डॉ. संदीप पाटील होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मुक्ताईनगरचे दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी श्री. बी.जी. पवार उपस्थित होते. यावेळी प्रमुख व्यक्ते म्हणून श्री. शैलेश वानखेडे, आरोग्य अधिकारी डॉ. अमितकुमार घडेकर, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. अविनाश कोळगे, सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे आणि श्री. समीर तायडे उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील म्हणाले की नवीन अभ्यासक्रम हा कौशल्याभिमुख असून कृषि क्षेत्रात त्याचे महत्व समजावून दिले. श्री. बी.जी. पवार यांनी सायबर सुरक्षा आणि रॅगिंग प्रतिबंध कायदा यावर मार्गदर्शन केले. डॉ. अमितकुमार घडेकर यांनी विद्यार्थ्यांना व्यसनामुळे युवकांवर होणारे दुष्परिणाम व उपाययोजना याबद्दल अवगत केले. श्री. शैलेश वानखेडे यांनी विद्यार्थ्यांना दिव्यांगासाठीचे कायदे आणि कलमे यावर मार्गदर्शन केले. श्री. समीर तायडे यांनी विद्यार्थ्यांना मादक पदार्थांचे सेवन व त्यामुळे युवकांवर होणारे दुष्परिणाम या विषयावर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. अविनाश कोळगे यांनी दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नामदेव धूर्वे आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सागर बंड यांनी तर आभार डॉ. ढाके यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन





**दि. १ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मुक्ताईनगर येथील कृषि महाविद्यालयात राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिनाचे औचित्य साधून कृषि महाविद्यालय आणि संजीवनी ब्लड सेंटर, फैजपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. यावेळी ब्लड बँक चमूमध्ये श्री. मोहीत बिरपण, सोनाली धनगर, डॉ. भारती महाजन, रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी श्री. नामदेव धुर्वे उपस्थित होते. एकूण ६० हून अधिक रक्तदात्यांनी स्वैच्छिक रक्तदान करून समाजसेवेची भावना जागृत ठेवली. याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. पाटील म्हणाले की रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून यामुळे आपण अनेकांचे जीव वाचवू शकतो. रक्तदान म्हणजे मानवतेची खरी ओळख आहे. श्री. कांचन नेहेते यांनी रक्तदानाबाबतीत असलेल्या

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

गैरसमजुती आणि फायदे वैज्ञानिकरित्या समजावून विद्यार्थ्यांना नियमित रक्तदानासाठी प्रेरित केले. श्री. धुर्वे यांनी राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिनाची पार्श्वभूमी व प्रयोजन विषद केले. शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरात रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी डॉ. अविनाश कोळगे, डॉ. आर. डी. चौधरी, श्री. प्रशांत नागे, डॉ. गणेश देशमुख, डॉ. आर. एस. शेख, डॉ. बी. डी. रोमाडे, प्रा. आर. एस. बागुल, प्रा. एन. जी. धूर्वे, डॉ. मनीषा पालवे, डॉ. सागर बंड, सौ. माधुरी बेलसरे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी डॉ. कुशाल ढाके यांनी आभार मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे एक दिवसीय शेवगा लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न





**दि. ९ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शेतकऱ्यांकरिता एक दिवसीय शेवगा लागवड तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. याप्रसंगी आत्माचे प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनवणे, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, आत्माचे प्रकल्प उपसंचालक श्री. विनय बोरसे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. इल्हे यांनी शेवगा पिकाचे महत्व स्पष्ट करत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विविध उत्पादने यांची माहिती दिली. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. अतिश पाटील यांनी शेवगा पिकातील एकात्मिक अन्न द्रव्य व्यवस्थापन, डॉ. पंकज पाटील यांनी शेवगा पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, श्रीमती अमृता राऊत यांनी शेवगा आणि प्रक्रिया उद्योग या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. धनराज चौधरी यांनी शेवगा पाल्याचे पशु आहारातील महत्व याची माहिती दिली. डॉ. दिनेश नांद्रे यांनी सुधारित शेवगा लागवड तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी तर आभार श्री. जगदीश कथेपुरी यांनी मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम संपन्न



**दि. १६ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त

विद्यमाने कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे होते. याप्रसंगी आत्माचे प्रकल्प संचालक श्री. हितेंद्र सोनवणे, प्रकल्प उपसंचालक श्री. विनय बोरसे, डॉ. पंकज पाटील, श्री. जगदीश कथेपुरी, श्री. रोहित कडू डॉ. अतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी उपस्थित होते. यावेळी डॉ. नांद्रे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्र शेतकऱ्यांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. अतिश पाटील यांनी रबी हंगामतील प्रमुख पिकातील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, डॉ. पंकज पाटील यांनी रब्बी हंगामतील प्रमुख पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, श्रीमती अमृता राऊत यांनी शेवगा आणि प्रक्रिया उद्योग, श्री. रोहित कडू यांनी रबी हंगामातील प्रमुख भाजीपाला लागवड तंत्रज्ञान व श्री. जगदशी कथेपुरी यांनी रब्बी हंगामतील प्रमुख पिकाचे लागवड तंत्रज्ञान या विषयी उपस्थिताना मार्गदर्शन केले. डॉ धनराज चौधरी यांनी पशुधनातील लसीकरणाचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी तर आभार श्री. जगदीश कथेपुरी यांनी मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे सघन लागवड प्रणाली अंतर्गत शिवार फेरी संपन्न



**दि. १७ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कापूस प्रकल्पातंर्गत सघन लागवड प्रणाली अंतर्गत शिवार फेरीचे आयोजन मु.पो. मालपुर, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे करण्यात आले होते. सदर शिवार फेरी नागपूर येथील कापूस विकास निर्देशालयाचे तंत्र अधिकारी डॉ. दिव्या सहारिया, कृषि विज्ञान केंद्राच्या विशेष कापूस प्रकल्पाचे जिल्हा नोडल अधिकारी श्री. जगदीश काथेपुरी, मालपूरचे मंडळ कृषि अधिकारी श्री. जीवन राणे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली. सदर शिवार फेरी दरम्यान विशेष कापूस प्रकल्प अंतर्गत श्री. दादा लाड तंत्रज्ञान प्रात्यक्षिके मौजे मालपूर येथे घेण्यात आली. त्याअंतर्गत श्री. दादा लाड कापूस तंत्रज्ञान याविषयी उपस्थित शास्त्रज्ञांनी पीक प्रात्यक्षिक पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे पशुपालक शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम संपन्न



**दि. २८ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या वतीने मौजे बल्हाने, ता.

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

जि. धुळे या ठिकाणी शेतकरी पशुपालक शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा सुसंवाद कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यावेळी या कार्यक्रमासाठी कृषि विज्ञान केंद्राचे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र या विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. धनराज चौधरी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. याप्रसंगी डॉ. धनराज चौधरी यांनी रबी हंगाममधील चारा लागवड तंत्रज्ञान व व्यवस्थापन या विषयी मार्गदर्शन केले. तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ संशोधित बहुवार्षिक चारा पिके यामध्ये प्रामुख्याने हायब्रीड नेपियर फुले जयवंत, फुले गुणवंत याविषयी माहिती दिली.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे मा. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या १८ व्या हप्त्याचे थेट प्रक्षेपण आयोजन



**दि. ५ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे भारत सरकारच्या प्रमुख योजनेंपैकी एक असलेल्या मा. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या १८ व्या हप्त्याच्या वितरणाचा थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. याप्रसंगी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वाळकुंडे तसेच विषय विशेषज्ञ, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशातील शेतकरी समुदायाला संबोधीत केले. या थेट प्रक्षेपणामुळे शेतकऱ्यांना या योजनेबद्दलची सखोल माहिती मिळाली तसेच शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी निर्माण झाली. कार्यक्रमाने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले आणि त्यांना सरकारच्या उपक्रमांबद्दल जागरूक केले. याप्रसंगी विविध गावांतील सहा तालुक्यांमधून सुमारे ६५ लाभार्थी/शेतकरी उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे महिला किसान दिन साजरा



**दि. १५ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या मोहोळ येथील कृषि विज्ञान केंद्रात महिला किसान दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचे आयोजन शेतकरी महिलांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी तसेच त्यांना नवीन कृषि तंत्रज्ञानाबद्दल

वर्ष :४, अंक क्र. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

जागरूक करण्यासाठी करण्यात येते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रम समन्वयक डॉ. टी. आर. वाळकुंडे होते. यावेळी विषय विशेषज्ञ सौ. के. एम. म्हात्रे, श्री. डी. एन. क्षीरसागर, डॉ. एस. आर. कदम उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. वाळकुंडे यांनी शेळीपालन, पशुपालन आणि संलग्न शेती तंत्रज्ञानाच्या महत्त्वाविषयी माहिती दिली. सौ. म्हात्रे यांनी माती आरोग्य व्यवस्थापन आणि नैसर्गिक शेतीचे फायदे, श्री. क्षीरसागर यांनी पीएमएफएमई योजनेची माहिती तर डॉ. कदम यांनी शेतात वापरल्या जाणाऱ्या अवजारांबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी महिला किसान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा व उखाणा स्पर्धेसारख्या मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ येथे जागतिक अन्न दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**दि, १६ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर यांच्या सहकार्याने पोखरापूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे उत्तम जीवन आणि उज्वल भविष्यासाठी अन्नाचे हक्क या थीम अंतर्गत जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ श्री. डी. एन. क्षीरसागर यांनी पोषण आणि आरोग्य तसेच बायोफोर्टिफाईड पिके या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी कुटुंबांना परभणी शक्ती नावाच्या बायोफोर्टिफाईड ज्वारी वाणाचे बियाणे वितरित करण्यात आले. ज्यामध्ये ४५ पीपीएम लोह, ३२ पीपीएम झिंक आणि ११.९ टक्के प्रथिने आहेत. या उपक्रमामुळे शेतकरी कुटुंबांच्या पोषण सुरक्षिततेला हातभार लागेल आणि त्यांच्या आहारात पौष्टिकतेची भर पडेल.

## कसबे डिग्रज येथील कृषि तंत्र विद्यालयास निर्भया पथकाचे मार्गदर्शन



**दि. ४ ऑक्टोबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे सांगली जिल्हा पोलीसदल अंतर्गत उपविभागीय पोलिस अधिकारी विमला एम. यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असणाऱ्या निर्भया पथकाने भेट देऊन विद्यार्थी, विद्यार्थिनींशी हितगुज करून मार्गदर्शन केले. यावेळी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज माळी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख महिला पोलिस उपनिरीक्षक छाया सुतळे, महिला सहाय्यक पोलिस फौजदार निलोफर हुजरे, महिला पोलिस हेडकॉन्स्टेबल वंदना कांबळे उपस्थित होते. याप्रसंगी छाया सुतळे यांनी विद्यार्थ्यांना जीवन जगताना आदर्श जीवन कसे जगावे याचे मार्गदर्शन केले. छोटी चूक भविष्यात किती नुकसानकारक ठरू शकते हे उदाहरणासहित समजावून सांगितले. निलोफर हुजरे यांनी कृषि शिक्षण हे महत्त्वपूर्ण शिक्षण असून उत्कृष्ट कृषि पद्धती आचरणात आणाव्यात आणि देशासाठी सुजाण नागरिक व्हावे. महिला पोलिस हेडकॉन्स्टेबल वंदना कांबळे यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. डॉ. मनोज माळी यांनी महिलांच्या आणि विद्यार्थिनींच्या सुरक्षेतेसाठी कार्यरत असणाऱ्या निर्भया पथकाचे महत्व, गरज, कायदे याच्या कार्यपद्धतीविषयी विद्यार्थी, विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

वर्ष :४, अंक क्रं. : ४६, ऑक्टोबर, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## नोव्हेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- आडसाली ऊसासाठी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवडयात संजीवकांच्या तिसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी ३५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) १४ ग्रॅम, ३५०० ग्रॅम १९:१९:१९, ८७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व १७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- आडसाली उसाला साडे चार महिने झाले असल्यास मोठी बांधणीची कामे करावीत. बांधणीचे वेळी प्रति हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) (७.७१ पोती), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) व ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) ही रासायनिक खतांची मात्रा द्यावी तर को ८६०३२ जातीसाठी प्रति हेक्टरी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया) (९.६४ पोती), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (१३.८९ पोती) व १०० किलो पालाश (१६६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.६९ पोती) अशी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- लोकरी मावाग्रस्त ऊसावर मित्रकीटक आढळून आल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये. लोकरी माव्यासाठी डिफा ॲफिडीव्होरा, मायक्रोमस, क्रायसोपर्ला यासारख्या मित्र किटकांचे संवर्धन करावे. तसेच ऊसासाठी शिफारशीत रासायनिक खतांचा संतुलीत वापर करावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास पाण्याबरोबर प्रति एकरी १२.५ किलो युरीया, ४.५ किलो युरीया फॉस्फेट व १३ किलो म्युरेट ऑफ पोटॅश या विद्राव्य खतांची मात्रा दर आठवडयातून एकदा द्यावी.
- लागणीसाठी को ८६०३२, फुले ०२६५, फुले १०००१, फुले ०९०५७, कोसी ६७१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२ आणि फुले ऊस १३००७ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांचा जमिनीच्या मगदूरानुसार वापर करावा.
- पाणी बचत होण्याच्या दृष्टीने मध्यम जमिनीसाठी ७५-१५० सें.मी. व भारी जमिनीसाठी ९०-१८० सें.मी. पट्टा पध्दतीचा वापर करावा. सलग पद्धतीने लागवडीसाठी मध्यम जमिनीत १०० सें.मी. ते १२० सें.मी. तर भारी जमिनीमध्ये १२० ते १५० सें.मी. दोन सऱ्यातील अंतर ठेवावे.

### पाण्याच्या बचतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा.

- लागणीपूर्वी बेण्यास १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० मिनीटे बुडवून बेणे प्रक्रिया करावी. या बिजप्रक्रियेनंतर १ किलो ॲसेटोबॅक्टर अथवा १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू १२५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात कांडया ३० मिनीटे बुडवाव्यात.
- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) (१.९३ पोती), को.८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) (१.६४ पोती), तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.
- पूर्वहंगामी उसात आंतरपिक म्हणून बटाटा, मुळा, लालबीट, पानकोबी, फुलकोबी, वाटाणा व कांदा, यासारख्या भाजीपाला पिकांचा समावेश करावा.
- लागणीनंतर वापसा येताच ५० ग्रॅम ॲट्राझिन किंवा मेट्रीब्यूझीन १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमिनिवरिल तणावर फवारावे. जमीन तुडवली जाणार नाही याची काळजी घ्यावी.
- माती परीक्षणाच्या आधारे सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट, १० किलो मॅंगेनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॅक्स हि सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त सुक्ष्म खते चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ प्रमाणात मिसळून ४ ते ५ दिवस सावलीत मुरवून शेतात चळी घेवून द्यावीत.

- ठिबक सिंचनाची सोय असल्यास पाण्यातून प्रति एकरी नऊ किलो युरिया, दोन किलो युरिया फॉस्फेट व सहा किलो म्युरेट ऑफ पोटॅश या विद्राव्य खतांची मात्रा दर आठवडयातून एकदा द्यावी.
- सुरु ऊस लागवडीसाठी पूर्व मशागतीची कामे पूर्ण करावीत.
- ऊस तोडणीनंतर शेतीतील पाचट पेटवू नये खोडवा ऊसामध्ये पाचट ठेवताना पाचटाची कुट्टी करू नये अगर एकआड एक सरीत पाचट ठेवू नये.
- ऊस तोडणीनंतर पाचट शेतात एकसारखे पसरून सरीत दाबून घ्यावे.
- उसाचे बुडखे मोकळे करुन धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व छाटनीनंतर १० लिटर पाण्यात १० ग्रॅ कार्बेन्डॅझीम मिसळून बुडख्यावर फवारणी करावी.
- पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया,१०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट फोकून द्यावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू शेणखतात मिसळून पाचटावर टाकावे.
- पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापसा आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी नत्र १२५ किलो (२७१ किलो युरिया), स्फुरद ५८ किलो (३६३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट), पालाश ५८ किलो (९७ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) यांचे मिश्रण बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला १५ सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीने छिद्र घेवून द्यावे. दोन छिद्रामधील अंतर ३० सें.मी. ठेवावे.

**भुईमूग (उन्हाळी)**

- भुईमूग लागवडीसाठी मध्यम खोल, उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी.
- खरीप हंगामातील पीक निघाल्यानंतर जमिनीची खोल नांगरट करावी. त्यानंतर तीन ते चार कुळवण्याकरून ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अगर कंपोस्ट खत पसरावे.

**बागायती कापूस**

- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील.

**हरभरा व्यवस्थापन**

- पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.
- कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी खुरपणी करावी.
- घाटेआळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

**तूर**

- कमी कालावधीच्या पीक वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

**नाचणी**

- काढणीचा हंगाम : नोव्हेंबर – डिसेंबर
- पक्वतेची लक्षणे – पाने वाळतात, दाण्याचा रंग पिवळसर तपकिरी होवून कणसे तांबूस होतात.
- काढणीची पद्धत : कणसे खुडणे किंवा जमिनीबरोबर कापणी करणे.
- मळणी : कणसे बडवणे/बैलाने मळणी करणे / मळणी मशीन
- मळणीची वेळ : डिसेंबर– जानेवारी

**रब्बी ज्वारी**

- गरजेप्रमाणे दुसरी खुरपणी करावी व पेरणीनंतर ८ आठवड्यांनी दातेरे कोळप्याने तिसरी कोळपणी करून गरज असल्यास दुसरे संरक्षित पाणी द्यावे.

**गहू**

- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या १० तारखेपर्यंत करावी.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी नेत्रावती, फुले अनुपम या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी प्रती हेक्टर ७५ ते १०० किलो बियाणांचा वापर करावा.
- बागायती गव्हासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड करावी. तथापि, मध्यम जमिनीत भरखते व रासायनिक खतांचा योग्य वापर केल्यास उत्पादन चांगले घेता येईल.
- गव्हाच्या लागवडीपुर्वी खरीपाचे पीक निघाल्यानंतर १५ ते २० से.मी. खोलीवर नांगरट करावी.
- कुळवाच्या तीन ते चार पाळ्या द्याव्यात. खरीपामध्ये शेणखत दिले नसल्यास हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये मिसळावे.
- गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवाडयात करावी.
- वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एमएसीएस ६२२२, एमएसीएस ६४७८, डि.बी.डब्ल्यू. १६८ या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- पेरणीपुर्वी प्रती किलो गहू बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि पीएसबी प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे. असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी.
- बागायती वेळेवर पेरणी करतांना दोन ओळीत २० से.मी. अंतर ठेवून करावी. पेरणीसाठी दर हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे.
- बागायती वेळेवर पेरलेल्या गहू पिकास पेरताना प्रती हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश दयावे. पेरणीनंतर २१ दिवसांनी हेक्टरी ६० किलो नत्राचा दुसरा हफ्ता दयावा.

**आले**

- हिवाळयात १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पानावरील ठिपके रोगापासून आले पिकाचा बचाव करावा या रोगाची सुरुवात कोवळया पानावर होऊन नंतर तो सर्व पानावर पसरतो या रासेगामध्ये असंख्य लहान गोलाकार ठिपके तयार होतात. रागाची तीव्रता वाढत गेल्यास हे ठिपके एकत्र येवून संपूर्ण पान करपते. नियंत्रणासाठी डायथेन एम ४५, १० लिटर पाण्यात २५ ते ३० ग्रॅम किंवा बाविस्टीन १० लिटर पाण्यात १० ते १५ ग्रॅम किंवा १ टक्के बोर्डोमिश्रण तयार करून फवारणी करावी. हवामानाच्या परिस्थितीनुसार सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत १५ ते २० दिवसाच्या अंतराने फवारण्या कराव्यात. वरील औषधांचे आलटून–पालटून फवारण्या कराव्यात. एकच औषध सतत फवारणीसाठी वापरू नये.

**दूरस्थपणे चालणारा फवारणी रोबोट (फुले रोबो)**

- फुले रोबो ट्रॅक प्रकारचा दूरस्थ संचलित रोबोटिक फवारणी यंत्र विशेषतः फळबागा व ओळीमध्ये लावलेल्या पिकांसाठी विकसित करण्यात आले आहे.
- तपशीत : सर्वसाधारण आकारः १३०० x ८५० x ६३३ मिमी, जास्तीत जास्त वेगः ३–५ किमी/तास, चढण उतारः ३००, रबर ट्रॅकः २००० x १६० x ८ मिमी, बॅटरीः २३००० ाअह, टाकीची क्षमताः ७० लि., एकुण वजनः १४० किलो (भरलेल्या टाकीसहीत), प्रक्षेत्र

क्षमताः १.० – १.५ एकर/तास

- मोटर – २ नग, रेटेड ऑपरेटिंग व्होल्टेजः ४८ व्होल्ट, रेटेड पॉवरः १००० वॅट, वर्तमान भारः ४.० ॲम्पीअर, रेटेड टॉर्कः १४ किग्रॅ – सें.मी., रेटेड वेगः २५०० rpm
- फायदे : उंच–सखल आणि चिखलयुक्त शेत जमिनीमध्ये फवारणीसाठी कमी वजन त्यामुळे शेतात रुतत नाही, जास्त ताकद आणि ट्रॅकमुळे जमिनीला धरुन चालतो, दूरस्थ नियंत्रित वाहन, ३०० च्या चढ उतारावर सहजपणे चालतो, चालकाचा रसायनाशी संपर्क होत नाही त्यामुळे विषबाधा होण्याचा धोका नाही सेंट्रिफ्यूमल नोजल – २ नग, वेगः १२०० rpm, कणांचा आकारः ५०–१०० मायक्रॉन, व्होल्टेजः १२ व्होल्ट

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५७/२०२४**